# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक 2.0

# शेतकरी उत्पादक कंपनी

## स्वागतम

## जिल्हा संसाधन संस्था

# महाराष्ट्र ग्राम दर्पण

B4,आदर्श अपार्टमेंट मालटेकडी समोर टोपे नगर अमरावती,४४४६०२

प्रस्तावना :-

भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील सुमारे ५८ टक्के लोकसंख्टीवर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. परंतु दीर्घकाळापासून ती अनेक आजानांना सामोरे जात आहे. हवामान बदल, अनियमित पाऊस, सिंचन सुविधांचा अभाव, जमिनीचे तुकडीकर, अपादन खर्चात वाढ बाजारपेठेतील अस्थिरता आणि योग्य दर न मिळणे या समस्या ग्रामीण भातशेतक-यांसमोर उभ्या राहिल्या आहेत. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केंद्र शासनाने "प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना PMKEY)" ही महत्वाकांक्षी योजना राबविली आहे.या योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे "प्रत्येक थेंब पाण्यामा अधिक उत्पादनासाठी उपयोग" [Per Drop More Crop) हा आहे. पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, सुक्ष्म सिंचन तंत्रांबा वापर, शाश्वत जलसंधारण आणि क्षेत्र विकासाद्वारे कृषी उत्पादनात वाढ करणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेतर्गत केवळ सिंचनाच्या सुविधा वाढविणेच नाजे, तर शेतकऱ्यांचे सामूहिक सक्षमीकरण हे देखील अत्यंत महत्वाचे घटक मानले गेले आहेत.शेतकऱ्यांच्या या सामूहिक सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य शासनाने शेतकरी उत्पादक संघ (FPO - Farmer Producer Organization) या संकल्पनेवर विशेष भर दिला आहे. शेतकरी उत्पादक संघ म्हणजे समान हितसंबंध असलेल्या शेतकऱ्यांचा एकत्रित समूह, जो उत्पादन, प्रक्रिया, विपणन, साठवण, पुरवठा साखळी आणि मूल्यवर्धन या सर्व टप्प्यांमध्ये एकत्रितपणे काम करतो. FPO ध्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच मिळते आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळण्याची शक्यता वाढते.प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांमध्ये जलसंधारण, शेततळी निर्मिती, नाला खोलीकरण, सूक्ष्म सिंचन, आणि क्षेत्र विकास या सर्व कामांत शेतकरी उत्पादक संघांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. या संघांमार्फत स्थानिक शेतकऱ्यांची नियोजन प्रक्रियेत सहभागिता वाढते. शेतकऱ्यांनाच त्यांच्या भागातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे नियोजन, जल व्यवस्थापन आणि फसल व्यवस्थापनाचे निर्णय घेण्याची संधी मिळते.FPO च्या माध्यमातून शेतकऱ्यांना सामूहिक खरेदी-विक्री प्रणाली विकसित करता येते. बी-बियाणे, खत, कीटकनाशके आणि सूक्ष्म सिंचन साहित्य हे मोठ्या प्रमाणावर थोक दरात विकत घेऊन शेतकऱ्यांना कमी दरात देता येते. तसेच उत्पादन विक्रीसाठी सामूहिक विपणन केंद्रे उभारता येतात, ज्यामुळे मध्यस्थांचा हस्तक्षेप कमी होतो. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते आणि त्यांचे आर्थिक बळकटीकरण होते.प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत तयार होणाऱ्या विविध जलसंवर्धन संरचना जसे की बंधारे, शेततळी, पाण्याचे साठवण तलाव, नाले, पाईपलाइन प्रणाली इ. यांचे देखरेख व उपयोग FPO च्या माध्यमातून शेतकऱ्यांद्वारे करणे सुलभ होते. यामुळे या संरचनांचा शाश्वत उपयोग सुनिश्चित होतो आणि समुदाय स्तरावर जल व्यवस्थापनात सहभाग वाढतो.अशा प्रकारे FPO हे केवळ आर्थिक संस्था नसून ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम बनते. ते शेतकऱ्यांना प्रशिक्षण, तांत्रिक सल्ला, आर्थिक सक्षमता आणि बाजारपेठेतील स्थैर्य देते. यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो, तर गावस्तरावर टिकाऊ विकास घडतो.

**शेतकरी उत्पादक संघ –**

- भारतातील बहुतांश लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे.
- बहुतांश शेतकरी लहान आणि सीमांत वर्गातील आहेत.
- जमिनींचे क्षेत्रफळ मर्यादित असल्यामुळे उत्पादन खर्च जास्त आणि नफा कमी राहतो.
- बाजारपेठेतील अस्थिरता, दळणवळणव्यवस्था, योग्य तांत्रिक ज्ञानाचा अभाव, साठवण वित्तपुरवठ्याची व विपणनाची समस्या
- यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य मूल्य न मिळणे

या समस्यांवर उपाय म्हणून 'शेतकरी उत्पादक संघ (Farmer Producer Organization § FPO)" ही संकल्पना उदयास आली.

**शेतकरी उत्पादक संघचा मूलभूत हेतू**

- शेतकऱ्यांना संघटित करणे
- त्यांच्या सामूहिक शक्तीच्या माध्यमातून उत्पादन, प्रक्रिया, विपणन, साठवण, निर्यात आणि मूल्यवर्धन या सर्व टप्प्यांवर आर्थिक सक्षमता मिळवून देणे.

**शेतकरी उत्पादक संघ** म्हणजे समान उद्दिष्ट असलेल्या आणि एका भौगोलिक क्षेत्रातील शेतकऱ्यांनी स्वेच्छेने तयार केलेली संस्था होय.

- कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत असते आणि ती "Producer Company" या प्रकारात येते.
- प्रत्येक शेतकरी हा संस्थेचा सदस्य असतो
- संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालवले जाते.

- प्रत्येक सदस्याला मतदानाचा समान अधिकार असतो, मग त्याच्याकडे कितीही शेती असो

**FPO चे मुख्य कार्य**

- शेतकऱ्यांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकत्रित पद्धतीने उपाययोजना करणे. उदाहरणार्थ, बी-बियाणे, खत, कीटकनाशके, सिंचन साहित्य, शेती उपकरणे यांची थोक खरेदी करून ती कमी दरात सदस्यांना उपलब्ध करून देणे.
- उत्पादनाच्या विक्रीसाठी सामूहिक बाजारपेठ निर्माण करणे, साठवणगृह व कोल्ड स्टोरेज उभारणे, प्रक्रिया केंद्र सुरू करणे आणि स्थानिक व राष्ट्रीय बाजारपेठेत थेट विक्री करणे
- शेतकरी उत्पादक संघामुळे शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास यांची संधी मिळते.
- सरकारकडूनही विविध योजना, अनुदाने आणि कर्ज सुविधा या संस्थांमार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या जातात.
- शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी मिळते आणि त्यांचे उत्पन्न वाढते.
- FPO चे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे सामूहिक निर्णयप्रक्रिया,
- संस्था आपले सर्व निर्णय सभाद्वारे आणि सदस्यांच्या सहभागाने घेते.
- पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढते.
- शेतकरी केवळ उत्पादक राहात नाही, तर तो व्यवस्थापक, नियोजक आणि उद्योजक बनतो
- शेतकरी उत्पादक संघ केवळ आर्थिक संस्था नसून सामाजिक आणि विकासात्मक परिवर्तनाचे साधन आहे.
- हे संघ स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, महिला सहभाग, जैविक शेती, जल व्यवस्थापन आणि टिकाऊ शेती पद्धती यांना चालना देतात. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळते.
- आजच्या काळात हवामान बदल, पाणीटंचाई, बाजारातील स्पर्धा आणि उत्पादन खर्चातील वाढ या सर्व आव्हानांना उत्तर देण्यासाठी FPO ही अत्यावश्यक ठरत आहे.
- शेतकरी उत्पादक संघांद्वारे लहान व सीमांत शेतकरी एकत्र येऊन मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करू शकतात.
- FPO च्या माध्यमातून "शेतकऱ्यापासून थेट बाजारपेठेपर्यंत" हा प्रवास सुलभ होतो. यामुळे मध्यस्थ कमी होतात, उत्पादनाचा योग्य दर मिळतो

- ग्रामीण भागात स्थिर उत्पन्नाचे साधन निर्माण होते.
- शेतकरी उत्पादक संघ हे केवळ आर्थिक विकासाचे माध्यम नाहीत, तर ते शेतकऱ्यांच्या स्वावलंबनाचे प्रतीक आहेत.
- सामूहिकतेच्या माध्यमातून प्रत्येक सदस्याचा सहभाग वाढतो आणि शेती क्षेत्रात नवे तंत्रज्ञान, आणि बाजाराभिमुखता येते.

**P.M.K.S.Y. अंतर्गत पाणलोट विकास घटक २.० मधील शेतकरी उत्पादक संघाचे स्थान**

- भारतातील ५८ टक्के लोकसंख्या शेतीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अवलंबून आहे.
- हवामान बदल,अनियमित पाऊसामुळे मातीचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना [PMKSY) ही महत्वाची योजना सुरु केली आहे.
- योजनेचा मुख्य हेतू प्रत्येक थेंब पाण्याचा अधिक उत्पादनासाठी उपयोग(Per Drop More Drop),प्रत्येक शेतात पाणी (Har Khet Ko Pani)
- योजनेचा एक महत्वपूर्ण घटक महणजे पाणलोट विकास घटक ( Watershed Development Component-WDC)
- या घटकाच्या अंतर्गत मृद: आणि जलसंवर्धन, भूजल पुनर्भरण, वनस्पती आच्छादन,क्षेत्र विकास, उपजीविका निर्मिती ही प्रमुख कामे केली जातात.

१.**सूक्ष्म नियोजन (Micro Planning)** पाणलोट विकासासाठी सूक्ष्म नियोजन हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

- FPO चे सदस्य गावातील नैसर्गिक साधन पाणी साठवण, भूजलस्तर, पिक पद्धती आणि उपलब्ध संसाधने यांचा सर्वेक्षण व नियोजन प्रक्रियेत सहभाग घेतात
- मिळालेल्या माहितीच्या आधारे सामुदायिक कृती योजना community Action Plan तयार केली जाते.
- जलसंधारण आणि मृदसंवर्धन कामांमध्ये सहभाग

**२.जल संधारण व मृद संधान कामात सहभाग** –शेततळे नाले,चेक डॅम,असे कामे FPOच्या माध्यमातून केले जातात

**३. सिंचन सक्षमीकरण आणि पाण्याचा कार्यक्षम वापर**

- FPO शेतकऱ्याना ड्रिप,स्प्रिंकलर,पाईपलाइन,ई.सुक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा अवलब करण्यास प्रवृत्त करतात.
- सामूहिक पातळीवर पाणी वापर योजना करणे व शेतात समान व योग्य प्रमाणात पाणी पोहोचवले.

**४. उत्पादन व्यवस्थापन आणि बाजारपेठ उपलब्धता-**

- शेती सुधारल्यानंतर उत्पादन वाढते. त्या उत्पादनाचे साठवण,प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेत विक्री यासाठी FPO महत्त्वाची भूमिका निभावते.जसे सामूहिक विक्री केंद्र

**५. उपजीविका उपक्रमांत सहभाग**

- शेतक-यांसोबतच महिलांनाही विविध उपजीविका क्रिया जसे की दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, भाजीपाला शेती, फुलशेती, मशरूम उत्पादन इ. सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाते.
- FPO या उपक्रमांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व विपणन सहाय्य पुरवतात.

**६. अभिसरण (Convergence) मध्ये भूमिका**

- FPO च्या माध्यमातून कृषी विभाग, जलसंधारण, ग्रामीण विकास, सहकार, पशुसंवर्धन, ऊर्जा, उद्योग इत्यादी विभागांना एकत्र करून योजना राबविण्यात येतात.उदाहरणार्थ कृषी विभागाकडून बी-बियाणे व तंत्रज्ञान, जलसंधारण विभागाकडून संरचना,

**७. जलसंधारण संरचनांची देखभाल**

- पाणलोट क्षेत्रात तयार झालेल्या संरचना दीर्घकाळ कार्यक्षम राहाव्यात म्हणून त्यांची देखभाल FPO कडे सोपवली जाते.

**FPO चा परिणाम आणि फायदे**

- **सामूहिकता वाढते:** शेतकऱ्यांमध्ये परस्पर सहकार्य, संवाद व नियोजन संस्कृती विकसित होते.
- **आर्थिक बळकटी**: सामूहिक खरेदी-विक्रीमुळे उत्पादन खर्च कमी होतो व नफा वाढतो.
- **पाण्याचा कार्यक्षम वापर:** सूक्ष्म सिंचन तंत्रामुळे पाण्याची बचत व उत्पादन वाढ होते.
- **शाश्वत शेती:** मृदसंवर्धन आणि जलसंधारणामुळे जमिनीची उत्पादकता वाढते.
- **महिला सक्षमीकरण:** महिला स्वयंसहायता गट आणि FPO यांच्या संयुक्त उपक्रमांमुळे महिलांना स्थिर उत्पन्नाचे साधन मिळते.
- **स्थानिक शासनाशी समन्वय:** ग्रामपंचायत आणि FPO एकत्र येऊन विकासाची कामे राबवतात
- **हवामान बदलाचा सामना:** FPO पिकांच्या विविधीकरणाद्वारे जोखीम कमी करतात आणि शाश्वत कृषी प्रणाली निर्माण करतात.

**बहिर्गमन (Exit) टप्प्यातील शेतकरी उत्पादक संघाची भूमिका**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत पाणलोट विकास घटक २० मध्ये राबविण्यात येणाऱ्या कामांचे उदिष्ट केवळ पाणी साठवण व मृदसंवर्धन करणे नसून, त्या माध्यमातून शाश्वत शेती व शेतकरी सक्षमीकरण साध्य करणे हे आहे. या संपूर्ण प्रक्रियेच्या शेवटच्या आणि अत्यंत महत्त्याच्या टप्यात म्हणजेच "बहिर्गमन टण्यात शेतकरी उत्पादक संघ ह है केंद्रस्थानी असतात.

**बहिर्गमन टप्याचे उद्दिष्ट** :-बहिर्गमन टप्पा म्हणजे प्रकल्पाचा शेवट झाल्यानंतरही विकासाची गती थांबू नये, संसाधनांचा योग्य वापर सुरू राहावा आणि समुदायाने स्वावलंबी होऊन पुढील वाटचाल करावी.याच उद्दिष्टासाठी FPO कडे पुढील जबाबदाऱ्या येतात:

- पाणलोट क्षेत्रात केलेल्या गुंतवनुकीचे देखभाल आणि सातत्य राखणे.
- शाश्वत शेती पद्धतींचे प्रसार आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.
- शेतकऱ्यांना बाजाराशी जोडणे आणि उत्पादनाया दर वाढवणे.
- संस्थात्मक व्यवस्था बळकट करणे जेणेकरून प्रकल्पानंतर सरकारी मदतीवर अवलंबित्व कमी राहील.

**बहिर्गमन टप्प्याचे परिणाम**

- प्रकल्प समाप्त झाल्यानंतरही विकास कार्याचा सातत्यपूर्ण परिणाम दिसून राहतो,
- FPO मार्फत शेतकऱ्यांना बाजारात स्पर्धात्मक स्थान मिळते.
- पाणलोट क्षेत्रात संसाधनांचा कार्यक्षम व जबाबदार वापर सुरु राहतो.
- गाव स्तरावर आर्थिक व सामाजिक स्वावलंबन वाढते.
- शासनाचे लक्ष हळूहळू निरीक्षणातून "मार्गदर्शन" या स्वरूपात वळते, कारण समुदाय स्वता निर्णय घेण्यास सक्षम होतो.
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY-WDC २.०) मध्ये शेतकरी उत्पादक संघ हे बहिर्गमन टप्प्यात प्रकल्पाची मालकीची भावना गावकऱ्यांमध्ये निर्माण करून, संसाधनांचे संवर्धन आणि उत्पादन व्यवस्थापनाची सातत्यपूर्ण साखळी निर्माण करणे ही त्यांची मोठी भूमिका आहे.यामुळे प्रकल्पानंतरही "पाणलोट विकास" हा सतत चालणारा जीवन प्रवाह बनतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होते

**बहिर्गमन (Exit) टप्प्यातील शेतकरी उत्पादक संघाची भूमिका**

१. प्रकल्प टिकवून ठेवणे- शासनाच्या निधी व हस्तक्षेप संपल्यानंतरही प्रकल्पातील क्रिया सातत्याने सुरु राहतील याची जबाबदारी संघा वर येते.

२. स्वयंनिर्भरता निर्माण करणे- प्रकल्पानंतर बाह्य आर्थिक सहाय्याशिवाय संघ स्वताच्या साधनांबर टिकून राहू शकेल यासाठी उत्पन्न प्राप्तीचे उपक्रम राबवणे.

- कृषी उत्पन्नावर आधारित प्रक्रिया उद्योग, विपणन, व मूल्यवर्धनाचे उपक्रम विकसित करणे.सदस्यांकडून वार्षिक शुल्क, लाभांश, सामूहिक विक्री इत्यादी मार्गाने निधी उभारणे,

३. संपत्तीचे व्यवस्थापन (Asset Management)- पाणलोट क्षेत्रात निर्माण केलेल्या सर्व संरचना (जसे: शेततळी, नाला बांध, पाणी साठवण टाकी) यांचे ताबा व देखभाल संघाकडे हस्तांतरित करणे.त्या संरचनांचा योग्य व समतोल वापर, दुरुस्ती आणि लेखा नोंदी ठेवणे,सामूहिक वापरासाठी नियमावली तयार करून पालन सुनिश्चित करणे.

४. कृषी उत्पादन वाढ व विपणन साखळी सामूहिक शेती पद्धती, सेंद्रिय शेती, विविध पिकपद्धतींचा अवलंब यासाठी मार्गदर्शन व सहकार्य करणे.उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठ शोधणे, थेट ग्राहकांशी संपर्क साधणे.कृषी प्रक्रिया (value addition) प्रकल्पांद्वारे नफा वाढवणे.

५. क्षमता बांधणी (Capacity Building)सदस्यांना प्रशिक्षण, कार्यशाळा, व जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे.नेतृत्व विकास, वित्तीय साक्षरता व व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे.कृषी व जलव्यवस्थापनातील नवतंत्रज्ञान आत्मसात करणे.

६. संस्थात्मक नेटवर्किंग व अभिसरण-कृषी, पशुसंवर्धन, मत्स्य, जलसंपदा, महिला बचत गट आदी संस्थांशी अभिसरण करून सर्वांगीण विकास करणे. सरकारी व बिगर सरकारी संस्थांशी समन्वय राखणे. नवीन योजनांचा लाभ सदस्यांपर्यंत पोहोचवणे.

७. सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारी पाणी, माती, आणि पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करणे. महिला, तरुण, व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांचा प्रकल्पातील सहभाग वाढवणे. हरित विकासासाठी वृक्षलागवड, सेंद्रिय खतांचा वापर प्रोत्साहन

८. लेखा व अहवाल सादरीकरण- सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शक ठेवणे व नियमित लेखा अहवाल सादर करणे. प्रकल्पाच्या प्रगतीचा व प्रभावाचा नोंद अहवाल (impact report) तयार करणे, पाणलोट समिती व स्थानिक प्रशासनाशी नियमित संपर्क राखणे,

९. दीर्घकालीन टिकाऊपणाची हमीसंघाचे ध्येय केवळ प्रकल्पाचा कालावधी नव्हे, तर दीर्घकालीन शेती विकास सुनिश्चित करणे आहे. सदस्यांमधील एकता, पारदर्शकता, आणि आर्थिक स्थैर्य कायम ठेवणे. भविष्यातील हवामान बदल, पाणीटंचाई, व बाजारातील बदल यांचा सामना करण्यासाठी योग्य धोरणे आखणे

**शेतकरी उत्पादक संघाची ग्रामीण विकासातील शाश्वतता-**

- शेतकरी उत्पादक संघ ही ग्रामीण विकासाच्या शाश्वततेसाठी उभी राहिलेली एक सामूहिक संस्थात्मक क्रांती आहे.
- ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया हाच शेती आणि जलसंपत्ती व्यवस्थापनावर आधारित असतो. शेतकरी उत्पादक संघ म्हणजे अनेक लहान शेतकऱ्यांना एकत्र आणून सामूहिक शक्ती निर्माण करणारी आणि त्या शक्तीच्या आधारे आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय विकासाला दिशा देणारी संस्था होय.
- FPO मुळे  ग्रामीण भागात संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो, उत्पादनक्षमता वाढते, बाजारपेठेशी थेट संपर्क साधला जातो आणि शेतकऱ्यांचा उत्पन्नस्तर उंचावतो. हाच विकासाचा प्रवास शाश्वततेकडे नेतो.
- ग्रामीण विकासाची खरी शाश्वतता म्हणजे स्थानिक संसाधनांचा योग्य व दीर्घकालीन वापर करून गाव स्वत:चे नियोजन स्वतः करू शकेल
- शेतकरी उत्पादक संघ शेतकऱ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करतो, उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन या सर्व टप्प्यांवर एकत्रित प्रयत्न करतो आणि शेतीला व्यवसायिक दृष्टिकोन देतो..
- .शाश्वततेचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे पर्यावरणीय संतुलन राखत उत्पादनक्षमता वाढवणे. शेतकरी उत्पादक संघ पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, मृदसंवर्धन आणि सेंद्रिय शेतीसारख्या उपक्रमांद्वारे नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करतो.

- FPO सामूहिक खरेदी-विक्रीची पद्धत स्वीकारून शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी करण्याची आणि उत्पन्न वाढवण्याची संधी देते.
- बाजारपेठेत थेट विक्री करून मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी केले जाते. FPO स्वतःचे ब्रांड तयार करून स्थानिक उत्पादनांना मूल्यवर्धनाची संधी देते.
- उत्पादन प्रक्रिया जसे की धान्य स्वच्छता, पॅकिंग, खाद्यपदार्थ निर्मिती, दुग्ध प्रक्रिया इत्यादी उपक्रमांमुळे गावात रोजगारनिर्मिती होते. यामुळे गावातील आर्थिक क्रियाकलाप वाढतात आणि पैशांची परतफेड गावातच राहते.
- FPO च्या माध्यमातून सामाजिक शाश्वततेचा पाया देखील मजबूत होतो. शेतकरी संघटनांमुळे समाजात सहकार्य, एकोपा आणि सामूहिक जबाबदारी निर्माण होते. महिलांना या संघात सक्रीय भूमिका मिळते.
- महिला स्वयंसहाय्यता गटांचे उत्पादन उपक्रम, घरगुती प्रक्रिया उद्योग, पशुपालन किंवा बियाणे उत्पादन यामुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढते.
- ग्रामीण समाजात निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्याने समाजात समता आणि संवेदनशीलता निर्माण होते.
- दुर्बल घटक, भूमिहीन कामगार, आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना FPO च्या माध्यमातून संसाधनांचा समान लाभ मिळतो. समाजातील विविध घटकांना समान संधी मिळणे हेच सामाजिक शाश्वततेचे मुख्य लक्षण आहे.
- FPO शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाशी जोडते. मोबाइल ॲप, हवामान पूर्वानुमान, पीक नियोजन सॉफ्टवेअर, माती परीक्षण, आणि डिजिटल नोंदी या सर्व बाबी शेतकऱ्यांच्या दैनंदिन व्यवहाराचा भाग बनतात, प्रशिक्षण शिबिरे आणि कार्यशाळा घेऊन नव्या तंत्रज्ञानाचा प्रसार केला जातो.
- शेतकरी उत्पादक संघ प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० चा आत्मा आहे.शेतकरी उत्पादक संघ तयार होणे व टिकणे ग्रामीण भारताच्या आर्थिक उन्नतीत शेती हा मुख्य आधार आहे.

- लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांना बाजारपेठ, तंत्रज्ञान, भांडवल आणि माहिती यांचा अभाव भासत असतो. या अडचणींवर मात करण्यासाठी शेतकरी उत्पादक संघ (Farmer Producer Organization & FPO) हा सामूहिक प्रयत्नाचा प्रभावी मार्ग आहे.
- शेतकरी उत्पादक संघ म्हणजे समान हितसंबंध असलेल्या शेतकऱ्यांचा एकत्रित गट, जो नोंदणीकृत संस्थेच्या स्वरूपात कार्य करतो.शेतकरी उत्पादक संघाची निर्मिती ही एक नियोजनबद्ध प्रक्रिया आहे.
- ठराविक क्षेत्रातील शेतकऱ्यांचा सर्वेक्षण करून त्यांच्या गरजा, उत्पादन पद्धती, विपणनाची स्थिती आणि स्थानिक साधनसामग्रीचे मूल्यमापन केले जाते.
- त्यानंतर या शेतकऱ्यांना एकत्र आणून सामूहिक कृतीचे महत्त्व रामजावले जाते. या टप्प्यात प्रशिक्षण, जागृती व मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक असतात. कृषी उत्पादनाचे मूल्यवर्धन, बाजारपेठेतील स्थैर्य, उत्पादन खर्च कमी करणे आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे हे मुख्य उदिष्टे असतात.
- नोंदणीसाठी शेतकरी उत्पादक कंपनी कायदा, सहकारी संस्था अधिनियम किंवा संबंधित नियमांनुसार प्रक्रिया पूर्ण केली जाते. संघ नोंदणीकृत झाल्यानंतर त्याला एक विधिसंमत ओळख मिळते
- FPO तयार झाल्यानंतर त्याचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे कार्यक्षम व्यवस्थापन, यामध्ये संचालक मंडळाची निवड, लेखा प्रणाली, निधी व्यवस्थापन आणि कार्ययोजना निश्चित केली जाते.
- सदस्यांमधील पारदर्शकता आणि विश्वास टिकवणे हे संघाच्या टिकाऊपणाचे मूलभूत आधार असतात.संघाच्या टिकण्यासाठी आर्थिक स्थैर्य फार महत्त्वाचे असते.
- FPO ना सरकारी योजना, NABARD, SFAC, NCDC यांसारख्या संस्थांकडून भांडवली सहाय्य मिळते.
- दीर्घकाळ टिकण्यासाठी FPO ला स्वतःच्या उत्पन्न स्रोतांची निर्मिती करावी लागते,शेती उत्पादनाचे थेट विपणन, सामूहिक खरेदी, बी-बियाणे व खत पुरवठा, उत्पादन प्रक्रिया व मूल्यवर्धन केंद्रांची स्थापना यांचा समावेश होतो.

**ग्रामपातळीवर शेतकरी उत्पादक संघ (FPO) मार्फत Forward, व Backward& Linkage**:

Backward Linkage (पश्चसाखळी)-

Backward linkage म्हणजे शेतीपूर्व आवश्यक घटकांशी व्यवस्था (Input System) मजबूत संबंध तयार करणे, FPO मार्फत ही साखळी गावाच्या पातळीवर खालील प्रकारे उभी राहते

१. **इनपुट खरेदीचे केंद्रीकरण:**FPO शेतकऱ्यांकडून एकत्रित मागणी गोळा करून बियाणे, खत, कीटकनाशके, सिंचन साहित्य मोठ्या प्रमाणावर थेट उत्पादक कंपन्यांकडून विकत घेतात, त्यामुळे शेतकऱ्यांना स्वस्त दरात दर्जेदार साहित्य उपलब्ध होते.

२. **गुणवत्तेचे नियमन:**FPO खरेदी करताना प्रमाणित बँड, ISI/Agmark उत्पादन निवडते, त्यामुळे शेतीतील उत्पादनाची गुणवत्ता सुधारते.

३. **कृषी यंत्रसामग्री व सेवा केंद्र**:ट्रॅक्टर, थ्रेशर, पंपसेट, ड्रिप-इन्स्टॉलेशन यांसारख्या यंत्रांचे सामूहिक वापर केंद्र (Custom Hiring Center) उभारून FPO शेतकऱ्यांना कमी दरात सेवा देते

४.**तंत्रज्ञान व प्रशिक्षण:**कृषी विभाग, कृषी विद्यापीठे आणि खाजगी संस्था यांच्या सहकार्याने FPO शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, मृदा चाचणी, जल व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण पुरवते.

५. **अर्थसहाय्य व विमा:** बँक, NABARD, आणि कृषी सहकारी संस्थांमार्फत FPO ला कर्ज आणि विमा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, ज्यामुळे उत्पादनासाठी भांडवल उपलब्ध होते.त्यामुळे FPO शेतीच्या मागील टप्प्यातील (input side) गरजा स्वताच्या व्यवस्थापनातून पूर्ण करून उत्पादन खर्च कमी आणि उत्पादन क्षमता वाढवते,

Forward Linkage (अग्रसाखळी)Forward linkage म्हणजे उत्पादनानंतरची प्रक्रिया, साठवण, विपणन व विक्री या टप्प्यांशी जोडले जाणे.FPO ही साखळी खालील पद्धतीने मजबूत करते

१. **उत्पादनाचे वर्गीकरण व साठवण:**FPO गावातच साठवणगृह, थंडगार साठे (cold storage) किंवा प्रक्रिया केंद्र उभारते. त्यामुळे पिकांचे नुकसान कमी होते व बाजारात योग्य वेळी विक्री करता येते

२. **स्थानिक बाजारपेठेतील विक्री:**FPO थेट बाजारभावावर शेतमाल विक्री केंद्र (Agri Mart) सुरू करून मध्यस्थांशिवाय शेतकऱ्यांना योग्य दर देते.

३. **थेट खरेदीदारांशी करार:** खाद्यपदार्थ उत्पादक कंपन्या, व्यापारी, कृषी प्रक्रिया उद्योग यांच्याशी FPO बेट करार करून कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग सारख्या मॉडेलचा अवलंब करते.

४. **मूल्यवर्धन (Value Addition):** उत्पादनाची प्रक्रिया - जसे धान्य दळणे, मसाले तयार करणे, पॅकिंग, ब्रेडिंग FPO स्तरावर केली जाते, ज्यामुळे नफ्यात लक्षणीय वाढ होते.

५. **डिजिटल मार्केटिंग व ई-नाम:** FPO आपला माल e-NAM, ONDC, Amazon Kisan Store सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर विकून राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ वाढवते.

६. **निर्यात व ब्रेडिंग:** गुणवत्तेचे प्रमाणपत्र घेऊन FPO आपले उत्पादन "स्थानिक ते जागतिक" (Local to Global) करण्यासाठी निर्यातक्षम ब्रेड विकसित करते.या साखळीद्वारे FPO शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजाराशी जोडते, त्यांना योग्य किंमत, स्थिर मागणी आणि दीर्घकालीन उत्पन्न उपलब्ध करून देते.

- एकात्मिक परिणाम Forward आणि Backward Linkage निर्माण झाल्यामुळे –
- गावपातळीवर कृषी मूल्यसाखळी (Value Chain) मजबूत होते.
- शेतकरी बाजारपेठ व तंत्रज्ञानाशी जोडलेले राहतात.
- “खर्च कमी व नफा जास्त” मिळतो.
- रोजगारनिर्मिती व ग्रामीण उद्योगविकासाला चालना मिळते.
- ग्रामपातळीवरील आर्थिक शाश्वतता आणि स्वावलंबनाचा पाया बळकट होतो

# माझी सुंदर शेतीवाडी

नाही कुणीही मालक माझा, मी न कुणाचा गडी
माझी सुंदर शेतीवाडी,माझी सुंदर शेतीवाडी !!ध्रु!!

शिवारातले माती पाणी, जागजागी अडविले
तलाव विहीरी तुडूंब भरल्या पाणीच पाणी झाले
शांताबाई हरभऱ्याची ओटीत भाजी खुडी !!१!!

हिरवा हिरवा चना वाटणा बांधा बंधातुन
कशी काय मध उचली माशी फुलाफुलापासून
मळ्यात माझ्या कांदा मिरची पालक मेथी जुडी !!2!!

इथे जोंधळे तिथे बाजरी,पिक अस उगवल
मुठभर दाने शंभर झाले घरात ना मावल
काळ्या माती संग चालते संसाराची घडी !!3!!